A218A23MAR. Seat Number: - __________

वेळ:- ३ तास. गुण:- १००

सूचना: १. सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.

२. उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

प्रश्न १.(अ) 'काव्यरंग' या कवितासंग्रहाच्या आधारे "ग्रामीण जीवन" व्यक्त करणाऱ्या कथांचा आढावा घ्या? (२०)

किंवा

(आ) 'काव्यरंग' या कवितासंग्रहाच्या आधारे राष्ट्रप्रेमाबरोबरच , सामाजिक अभिसरण प्रकट करणाऱ्या कवितांचा आढावा घ्या?

प्रश्न २. (अ) 'जाणीव , बापूजींना उद्देशून' या कवितेचे आशय वैशिष्ट्य स्पष्ट करा? (२०)

किंवा

(आ) 'पशु व झुलवे' या कवितांचा असे स्पष्ट करा?

प्रश्न ३. पुढीलपैकी दोन टिपा लिहा. (१०)

१. "बापूजींना उद्देशून" या कवितेतील कारवालो यांचे विचार.

२. "आंघोळ न केलेला पाऊस" या कवितेतील दारिद्र्याचे वर्णन.

३. "तिचं बाई होत जाण" या कवितेतील स्त्रीची अवस्था.

४. "शोध" मधील समाजातील सत्यता स्पष्ट करा.

५. शेतकरी व त्याची होणारी घालमेल कवितासंग्रहात कशी मांडली ते स्पष्ट करा.

प्रश्न ४.(अ) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची शतकोत्तर रजत जयंती साजरी करण्यासाठी तुमच्या सोसायटीतील रहिवाशांनी आयोजित केलेल्या सभेचे इतिवृत्त तयार करा. (१०)

किंवा.

(आ) जनसेवा मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली या सभेचे इतिवृत्त लिहा.

प्रश्न ५. (अ) 'विदिशा साडी सेंटर' या दुकानाची जाहिरात तयार करा. (१०)

किंवा

(आ) 'स्टेशनरी' (वह्या पुस्तके) दुकानाची जाहिरात तयार करा.

प्रश्न ६. खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. (१०)

मानवी समाज निर्दोष असू शकतात का? समाजामध्ये कशाला मान्यता आहे? काय योग्य आहे? काय बहुमूल्य आहे. याची उत्तरे स्थळ काळ आणि संदर्भानुसार बदलतात. आपण ज्या संस्कृती अथवा गटाचा भाग

आहोत त्यातील समूह केंद्रिततेला प्रोत्साहन देण्याची वृत्ती नजरेस पडते. समूह केंद्रीयतेची अतिरेकी भावना सामाजिक ऐक्यासाठी घातक ठरते. सामाजिक बांधिलकी साठी इतर संस्कृतीचा आदर, स्व समीक्षा, टीकात्मक परीक्षण आणि आत्मचिंतन होणे गरजेचे असते. आपण ज्या वैविध्याचा भाग आहोत त्याची अनेकांनी प्रशंसा करण्यासाठी असा दृष्टिकोन हितकारक ठरेल. भावना, श्रद्धा आणि धोके समजून घेण्यासाठी लोकांच्या जीवनकथा उपयुक्त ठरतात.

समाजाच्या प्रगतीमध्ये बाधा आणणाऱ्या किंवा समाजाचे विभाजन करणाऱ्या घटकांचा प्रभाव कमी करण्यासाठी नागरी समाजाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरू शकेल.

प्रश्न:

१. सामाजिक हितास कोणती प्रवृत्ती घातक ठरते?

२. लोकांच्या जीवनकथा कोठे उपयुक्त ठरतात?

३. समाजाच्या प्रगतीमध्ये बाधा आणणाऱ्या घटकांना कमी करण्यास कोण महत्त्वाची भूमिका पार पाडते?

४. सामाजिक हिताच्या संवर्धनासाठी कोणत्या कृती अपेक्षित आहेत.

५. वरील उताऱ्या समर्पक शीर्षक द्या?

प्रश्न ७. खाली दिलेल्या उताराचे सारांश लेखन करून योग्य शीर्षक द्या. (१०)

'समाजातील विविध मानवी मनांच्या महत्त्वकांक्षाच्या  कोणत्या दिशेने हाकलावयास पाहिजे. हे दाखविण्यासाठी मासिक पुस्तकातील लेख म्हणजे जणू काही होकायंत्र होत. असे म्हटल्यासारखंच नाही जुन्या व नव्या वाङ्मयाचे परीक्षण याचा उद्देशाने मासिक पुस्तकातून करण्यात येते. मासिक पुस्तकावर पथ्य सांगणारे धन्वंतरी होत. कोणतेही नाटक करायचे ते एकदा सूत्रधाराने ठरवून टाकल्यावर ज्याप्रमाणे कंपनीतील नटवर्ग आपापली भूमिका घेऊन नाटक प्रेक्षणीय व रम्य करण्याचा प्रयत्न करीत असतो. नाटकात भिन्न भिन्न भूमिका घेणाऱ्या लेखक वर्गाचे सूत्रधार आहेत असे म्हणावयास हरकत नाही.

प्रश्न ८. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लेखन करा (१०)

१. माय मराठीचे मनोगत २. जाहिराती कला ३. स्त्री जन्मा ही तुझी कहाणी

४. शिक्षण ही काळाची गरज